पत्रकारांना घरांसाठी जमिन देण्याबाबत
ठरविलेले पात्रतेचे निकष.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
शासन परिपत्रक क्रमांक : संकीर्ण-२०१९/प्र.क्र.४१/३४
मादामा कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय,मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- २२ ऑगस्ट, २०१९

परिपत्रक

पत्रकारांना घरे/पत्रकारांच्या गृहनिर्माण संस्थांना शासकीय जमीन देणे इ.संदर्भात पत्रकारांच्या संघटना लोकप्रतिनिधीकडून मागणी करण्यात येते. तथापि, पत्रकारांच्या घरांसाठी/गृहनिर्माण संस्थांसाठी जमिन मंजूर करण्यासाठी लाभार्थ्यांच्या पात्रता निकष काय असाव्यात, हे निश्चित नसल्यामुळे लाभार्थ्यांची पात्रता/निकष निश्चित करावी असा निर्णय मा.मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या पत्रकारांच्या दिनांक ३०.०६.२०१७ च्या बैठकीमध्ये घेण्यात आला. सदर निर्णयाच्या अनुषंगाने टि.व्ही जर्नलिस्ट असोसिएशन यांच्यासाठी खालील निकष ठरविण्यात येत आहे.

१) दूरचित्रवाणी माध्यमांकरिता वृत्त संकलन करण्याचा किमान सलग पाच वर्षांचा अनुभव आणि मंत्रालय आणि विधीमंडळ कामकाजाचे वार्ताकन करण्याचा सलग पाच वर्षाचा प्रत्यक्ष अनुभव असलेले पत्रकार (वरील अटींची पूर्तता करणारे पत्रकार हे स्वतंत्र व्यवसायी किंवा करार पध्दतीने नेमणूक झालेले अथवा श्रमिक पत्रकार असू शकतील)

२) वरील अटींची पूर्तता करणाऱ्या पत्रकारांपैकी अधिस्वीकृती धारक टी.व्ही (दूरचित्रवाणी) पत्रकारांना प्राधान्य.

३) ज्यांच्या स्वत:च्या नांवे किंवा पतीच्या/पत्नीच्या नावे मुंबई महापालिकेच्या कार्यक्षेत्रात सदनिका अथवा भूखंड नाही. तसेच ज्यांना यापूर्वी म्हाडा/सिडको/मुख्यमंत्री स्वेच्छाधिकार कोटयातून (१० टक्के ते ५ टक्के) यापूर्वी सदनिका घेतलेली नाही असे पत्रकार.

४) म्हाडा आणि सिडको या संस्थेच्या वतीने देण्यात येणाऱ्या घरे/सदनिकांबाबत जे निकष लावण्यात येतात त्या निकषात बसणारे पत्रकार.

५) टि.व्ही. वृत्त वाहिन्यांमध्ये वृत्तांकन करणारे पत्रकार आणि कॅमेरामेन (व्हिडीओ जर्नलिस्ट)

६) पत्रकार/व्हिडीओ जर्नलिस्ट यांचे पूर्णवेळ उपजिविकेचे साधन हे टि.व्ही. पत्रकारिता असली पाहिजे. (अशा वृत्तवाहिन्या केंद्र सरकारच्या माहिती व प्रसारण विभागात नोंदणी झालेल्या आणि २४ तास वृत्त प्रसारण करणाऱ्या असाव्यात.)

७) टि.व्ही. जर्नलिस्ट असोसिएशन ही वृत्तवाहिन्यांमधील काम करणाऱ्या पत्रकारांची अधिकृत संस्था असून संस्थेच्या सदस्यांना प्राधान्य दिले जाईल.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्यांचा सांकेतांक क्रमांक २०१९०८२२१६३३५३९६०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Ramkisan Narayanrao Musale

Digitally signed by Ramkisan Narayanrao Musale
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=e28f6332f6edfebdfb055bf154f99ec0b0d9e613209e20e7a215f026da6875ae, cn=Ramkisan Narayanrao Musale
Date: 2019.08.26 17:02:13 +05'30'

(रा.ना.मुसळे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा.अपर मुख्य सचिव, गृहनिर्माण विभाग, मंत्रालय,मुंबई
२. मा.प्रधान सचिव, नगरविकास विभाग-१, मंत्रालय,मुंबई
३. मा.प्रधान सचिव, महसूल व वनविभाग, मंत्रालय,मुंबई
४. मा.महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय,मुंबई
५. मा.सचिव, (माहिती व जनसंपर्क) सामान्य प्रशासन विभाग (का-३४), मंत्रालय, मुंबई
६. मा.व्यवस्थापकीय संचालक, सिडको, मुंबई
७. मा.व्यवस्थापकीय संचालक, म्हाडा, मुंबई
८. मा.जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर, मुंबई
९. मा.जिल्हाधिकारी, ठाणे
१०.विशेष कार्य अधिकारी (माध्यम सल्लागार) मा.मुख्यमंत्री सचिवालय, मंत्रालय,मुंबई
११.मा.मुख्यमंत्री सचिवालय, मुलाखत कक्ष, मंत्रालय,मुंबई
१२.मा.अध्यक्ष, मंत्रालय आणि विधिमंडळ वार्ताहर संघ, मुंबई
१३.मा.अध्यक्ष, टी.व्ही जर्नलिस्ट असोसिएशन, मुंबई
१४.निवडनस्ती